# महाराष्ट्र शासन

## विद्युत निरीक्षक, यांचे कार्यालय,

उद्योग, ऊर्जा , कामगार व खनिकर्म विभाग,
तिसरा मजला, इंदुलाल कॉम्प्लेक्सच्या पाठीमागे,
स.नं.७२१/२, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०.

| | |
|---|---|
| E-mail :- eipune.nrg-mh@gov.in | फोन नं. ०२०.२६६१००२९ |
| जा.क्र. /विनिपुणे/विशुनि/ 5728 /२०२५-२६ | दिनांक- 23/12/2025 |


ई-मेल द्वारा

प्रति,

अधीक्षक अभियंता ,
म.रा.वि.वि.कंपनी मर्या . **रास्तापेठ शहर** मंडळकार्यालय, पुणे

अधीक्षक अभियंता ,
म.रा.वि.वि.कंपनी मर्या . **रास्तापेठ ग्रामिण** मंडळ कार्यालय,
रास्तापेठ पुणे

अधीक्षक अभियंता ,
म.रा.वि.वि.कंपनी मर्या . **गणेशखिंड** मंडळ कार्यालय, पुणे

अधीक्षक अभियंता ,
म.रा.वि.वि.कंपनी मर्या . **बारामती** मंडळ कार्यालय, बारामती , पुणे

**मे. ईऑन खराडी ईन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.**
सेझ -I & सेझ-II खराडी पुणे

**मे. केआरसी इन्फ्रास्ट्रक्चर & प्रोजेक्ट प्रा.लि.**
खराडी पुणे

**मे. सेझ बायोटेक सर्विसेस प्रा.लि.**
हडपसर सेझ & मांजरी सेझ पुणे

**विषय :- वीज विक्री कराचे सुधारीत दर लागु करण्यासाठी शासन अधिसुचना**

**संदर्भ :-** उद्योग, उर्जा, कागगार व खनिकर्म विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना क्र.वीवीक-२०१८/ प्र.क्र.१६१/उर्जा-१ दि.१९.१२.२०२५.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की , **वीज विक्री कराचे सुधारीत दर दिनांक १ डिसेंबर २०२५ पासुन लागु करण्यासाठी संदर्भिय शासन अधिसूचने प्रमाणे** आपल्या स्तरावर पुढील उचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाही बाबत या कार्यालयास कळविण्यात यावे.

सोबत :- सदर्भिय शासन अधिसूचना

( नि.ग.सुर्यवंशी )
विद्युत निरीक्षक
विद्युत निरीक्षण विभाग, पुणे

**प्रत :-** मुख्य विद्युत निरीक्षक , उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग चेंबुर , मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर .

**प्रत :-** अधीक्षक अभियंता , पुणे प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ , उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर .

**प्रत :-** मुख्य अभियंता म.रा.वि.वि.कंपनी मर्या. पुणे /बारामती परिमंडळ कार्यालय यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

# अधिसूचना

उद्योग,ऊर्जा, कामगार व
खनिकर्म विभाग, मंत्रालय
मादामा कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १९ डिसेंबर, २०२५.

महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३

क्रमांक: वीविक - २०१८/प्र.क्र.१६१/ऊर्जा-१.-महाराष्ट्र विजेच्या विक्रीवरील कर अधिनियम, १९६३ (१९६३ चा महा.२१) च्या कलम ३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि शासन अधिसूचना क्रमांक वीविक - २०१८/प्र.क्र.१६१/ऊर्जा-१, दिनांक २६ डिसेंबर, २०१८ चे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे दिनांक १ डिसेंबर, २०२५ पासून खालील सारिणीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रामध्ये विद्युत उपक्रमाने विकलेल्या वीजेच्या प्रत्येक युनिटवर उक्त सारिणीच्या स्तंभ (३) येथे नमूद केलेले दर विनिर्दिष्ट करीत आहे.

सारणी

| अ.क्र. | क्षेत्र | वीज विक्री कराचे दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | टाटा पॉवर कंपनी, अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड व बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, टोरंट पॉवर लिमिटेड यांना मंजूर केलेल्या वितरण परवान्यातील क्षेत्रामध्ये वीज विक्रीबाबत- | |
| | क) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहक | ४३.९४ पैसे प्रती युनिट |
| | ख) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहक व्यतिरिक्त | ३५.९४ पैसे प्रती युनिट |
| २ | महाराष्ट्र राज्य वीज वितरण मर्यादित कंपनीच्या वितरण परवान्यातील शहरी क्षेत्रामध्ये औद्योगिक आणि व्यापारी ग्राहकांना वीज विक्रीबाबत | २८.९४ पैसे प्रती युनिट |
| ३ | राज्यातील अन्य क्षेत्रामध्ये वीज विक्रीबाबत,- | |
| | क) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहक | २७.९० पैसे प्रती युनिट |
| | ख) औद्योगिक आणि व्यापारी ग्राहक व्यतिरिक्त | निरंक |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(उध्दव दहिफळे)
शासनाचे सह सचिव.